एलवायटीएआर / 61 /२०१७

जा क्र.२०१७/जानप/नरवि/स.क्र.१२१(भाग) व १२१/६ (भाग)/6041
कार्यालय नगर परिषद,जालना.
दिनांक:- 16/ 11 /२०१७

प्रति,
मे.नेहा इन्फ्रास्ट्रक्चर्स, जालना तर्फे श्री.शैलेश सुभाषचंद्र देवीदान,
रा. जालना

विषय:- मौ. जालना, ता.जालना येथील स.क्र.१२१ (भाग) व १२१/६ (भाग) मधील ४४८२.९५ चौ.मी. क्षेत्राच्या भुमी अभिन्यासास निवासी प्रयोजनार्थ अंतिम मंजुरी मिळणे बाबत.

संदर्भ:- १. महाराष्ट्र नगर पालिका अधिनियम १९६५ च्या कलम १८९ व महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम- ४५
२. आपला अर्ज दिनांक ३०/१०/२०१७

संदर्भिय अर्जाच्या अनुषंगाने मौ. जालना, ता.जालना येथील सर्व्हे क्रमांक १२१ (भाग) व १२१/६ (भाग) मधील ४४८२.९५ चौ.मी. क्षेत्राच्या भुमी अभिन्यासास निवासी प्रयोजनार्थ खालील दर्शविलेल्या अटीवर भुमी अभिन्यासास निवासी प्रयोजनार्थ अंतिम मंजुरी देण्यात येत आहे.

-: अटी :-

१. भुमि अभिन्यासातील भुखंडाचा निवासी उपयोगी वापरासाठी उपयोगात आणावेत.
२. कोणत्याही भुखंडाचे विभाजन नगर परिषदेच्या मंजुरी शिवाय करता येणार नाही.
३. मंजुर भुमि अभिन्यासा प्रमाणे प्रथम सिटी सर्व्हे कार्यालयात भुमि अभिन्यासाची नोंद करण्यात यावी त्या प्रमाणे भुमि अभिन्यासाचे सिटी सर्व्हे कार्यालयाची प्रमाणीत प्रत कार्यालयात सादर करावी
४. भुमि अभिन्यासातील भुखंडावर इमारत बांधकाम करण्यापुर्वी प्रचलीत इमारत बांधणी व विकास नियंत्रण नियमावलीच्या अधिन राहुन बांधकाम परवानगी घेणे भुखंडधारकावर बंधनकारक राहील.
५. ह्या पत्रातील सर्व अटी भुखंड धारकाच्या लेखी निर्देशनास आणुन तसा उल्लेख खरेदी विक्री खतामध्ये करण्यात यावा.
६. या जमिनीस अकृषीक वापराची परवानगी घेतल्याशिवाय कुठल्याही भुखंडावर बांधकाम परवानगी देण्यात येणार नाही.
७. अकृषीक परवाना शुल्क संबंधित महसुल अधिका-याकडे दरवर्षी भरण्याची जबाबदारी आपणावर राहील.
८. सदरील अभिन्यासातील अंतर्गत सेवा रस्ते व विकास योजना रस्ता रु.१/- नाममात्र किमतीत नगर परिषद जालनास हस्तांतरीत करावे लागेल.
९. भुमी अभिन्यासातर्गत असलेली विकास कामे आपल्या स्वखर्चाने करण्यात यावी.
१०. भुमी अभिन्यास अंतर्गत असलेली विकास कामे पुर्ण केल्यानंतरच सदर ठिकाणी बांधकाम परवानगी देण्यात येईल
११. अकृषिक परवानगी प्राप्त केल्यानंतर भुखंड विक्री करणे आपणांवर बंधनकारक राहील.
१२. सदर जागेच्या मालकी हक्काबाबत भविष्यात काही वाद उदभवल्यास याची सर्वस्वी जवाबदारी आपणावर राहील.
१३. सदर प्रकरणी विषयांकीत जागेचा एकत्रित नगर भुमापन क्रमांक चा टोच नकाशा बांधकाम पुर्णत्वाच्या वेळी दाखल करणे बंधनकारक राहील.

नगर रचनाकार,
नगर परिषद,जालना.

मुख्याधिकारी,
नगर परिषद,जालना.

प्रतिलिपी -

१. मा.जिल्हाधिकारी,जालना यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा.नगर रचनाकार,जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांना माहितीस्तव.
३. उपअधिक्षक ,भूमि अभिलेख कार्यालय,जालना यांना माहितीस्तव.
४. उद्यान अधिक्षक, न.प.जालना यांना भूमि अभिन्यासातील रस्ते व खुली जागेभोवती वृक्षारोपण करणेस्तव.
५. मालमत्ता अधिक्षक, न.प.जालना यांना माहितीस्तव .
६. कर अधिक्षक, न.प.जालना यांना कर लावण्याबाबत पुढील कार्यवाही करणेस्तव.
७. स्वच्छता निरीक्षक, जुना जालना-२ न.प.जालना यांना माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव.

नगर रचनाकार,
नगर परिषद,जालना.

मुख्याधिकारी,
नगर परिषद,जालना